**स.के.नं. ३०३/२०१३**
**नि.क्र. ३१/क**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ याची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | **अमेष शंकर कोळी** |
| वय | - | **५७** |
| व्यवसाय | - | **व्यापार** |
| राहणार | - | **उरण विमला तलाव** |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. जी. पी. चव्हाण यांच्यामार्फत...**

१. दिनांक २९.०५.२०१३ रोजी भाविकटटी पोलिस कर्मचारी यांनी मला पोलिस स्टेशन उरण येथे बोलावले होते. त्यावेळी तेथे दुसरा पंच प्रफुल्ल म्हात्रे हा होता. तसेच तेथे फिर्यादी रूपाली मोकल ह्यासुध्दा हजर होत्या. तेथे आम्हांला एक सिडी दाखवली. ती सिडी चालवून दाखवली असता त्यात दगड मारताना दिसून येत होते. तसेच तीन फोटो तेथे आम्हांला दाखवले. त्याबाबतचा पंचनामा आम्हां पंचासमक्ष तयार केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही असून मजकूर खरा बरोबर आहे. तो पंचनामा दुपारी ३.३० वाजता सुरू करून ४.०० वाजताच्या सुमारास संपवला होता. करिता सदर पंचनाम्यास **निशाणी क्रमांक पि ६/ पि डब्लू ३** देण्यात येते. माझे समक्ष जप्त केलेले सिडी व फोटो दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला **भौतिक वस्तू क्रमांक क** वरील फोटो दाखवले. माझे समक्ष जप्त केलेले फोटो हेच आहेत. त्यावेळी ते फोटो क्लिअर होते. आता मला **भौतिक वस्तू क्रमांक ब** वरील सिडी दाखवली. माझे समक्ष जप्त केलेली सिडी हिच आहे. ती त्यावेळी माझे समक्ष लिफाफात बंद केली होती. त्या लिफाफ्यावर माझी सही आहे. .

सरतपास संपला.

**<u>उलटतपास आरोपींच्या वकील आर.आर. मोमीन</u>**

२ मी व प्रफुल्ल म्हात्रे मागील तारखेस पुरावा देण्यासाठी आलो होतो. परंतू ती तारीख मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सिडी आम्हांला लावून दाखवलीच नव्हती. सन २०२४ पासून मी येत असल्याने मला पंचनाम्याची तारीख आठवते. मी त्यादिवशी माझे कामानिमित्त तहसिल कार्यालयात गेलो होतो. माझे घरापासून तहसिल कार्यालयात जाण्यासाठी पायी अंदाजे १० मिनीटाचा वेळ लागतो. हे म्हणणे खरे नाही की, मला आज रोजी फिर्यादीने घटनेबाबत न्यायालयात असताना सांगितले. पंचनाम्याच्या दिवशी फिर्यादीने घटना काय घडली याबद्दल आम्हांला काहीही सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील मजकूर पुर्णपणे मला मान्य नाही. पंचनाम्याच्या दिवशी घटनेबाबत फिर्यादी रूपाली यांनी घटना घडल्याचे आम्हांला सांगितल्याबाबतचा पंचनाम्यात नमूद मजकूर बरोबर आहे त्यामुळे पंचनाम्यातील मजकूर मला मान्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आता सांगितलेला मजकूर चुकीचा आहे.

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

**उरण,**
**दिनांक – ०६.०४.२०२६**

**(एस. पी. वानखडे)**
**न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण**
**न्यायालय क्र. १**